माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १२२६/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. देवराव निळकंठ नाकाडे, रा. टिळक वार्ड, रामटेक, ता. रामटेक जि. नागपूर-४४११०६ | उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या., स.व सु. उपविभाग, रामटेक ता. रामटेक जि. नागपूर-४४११०६ | कार्यकारी अभियंता, स. व सु. विभाग, महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या., मौदा, ता. मौदा जि. नागपूर-४४११०४ |

**सुनावणी दिनांक :- १२.११.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०२.०५.२०२२

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मागितलेली माहिती देण्यात आली नाही. देण्यात आलेली माहिती पेज नं.१ व २ वाचण्यायोग्य नाही.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०३.०१.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३.०१.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दि. ०१.०५.२०२१ ते ३१.१२.२०२१ पर्यंत

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : नविन विज पुरवठा कनेक्शन करीता नगर परिषद कार्यालय/ग्रामपंचायत कार्यालय यांचे चालु घर टॅक्स पावती (कर पावती) यांची आवश्यकता आहे काय? असल्यास कंपनीचे असलेल्या परिपत्रकाची कॉपी सादर करावी. दि. ०१.०५.२०२१ पासून रामटेक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते

उपविभागाअंतर्गत घरगुती व वाणिज्य यांचे नविन कनेक्शन दिलेल्या ग्राहकांची यादी व चालु कर पावतीची झेरॉक्स पावती सादर करावी. दि. ०१.०५.२०२१ ते ३१.१२.२०२१ पर्यंत.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक २५.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, मुद्दा क्र. १ बाबत नवीन वीज पुरवठा कनेक्शन करिता Conditions of Supply MERC Regulations २००५ मधील Condition २.१ अनुसार महावितरण वेबसाईट वर नवीन कनेक्शन करिता आवश्यक कागदपत्रांची माहिती देण्यात आली आहे. तसेच मुद्दा क्र. २ बाबत दि. ०१.०५.२०२१ पासून ३१.१२.२०२१ पर्यंत रामटेक उपविभाग अंतर्गत घरगुती व वाणिज्य यांचे नवीन कनेक्शनची यादी अपिलार्थीस दिलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम ८ पोटकलम(१)च्या खंड(ञ)अनुसार ग्राहकांची कर पावती देता येणार नाही, असे अपिलार्थीस सुचीत केले आहे.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०९.०२.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ११.०२.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक ०८.०३.२०२२ रोजी सुनावणी घेवून दिनांक ११.०३.२०२२ अन्वये, अर्जदारास जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, रामटेक यांचेतर्फे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती अर्जदारास प्राप्त झाली नसल्याचे सांगितले. त्यामुळे अर्जदाराने रामटेक उपविभाग येथे दि. ०३.०१.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सादर केलेल्या अर्जानुसार मागितलेली माहिती अर्जदारास १५ तारखेपर्यंत उपलब्ध करुन देण्याचे आदेश जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, रामटेक उपविभाग यांना देण्यात आले, असे आदेश पारीत केले आहे.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

आज सुनावणीत उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.भारत बालपांडे यांनी स्पष्ट केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत दिनांक २५.०१.२०२२ रोजी उपलब्ध व देय असलेली माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम ८ पोटकलम(१)च्या खंड(ञ)अनुसार ग्राहकांची कर पावती देता येणार नाही, असेही अपिलार्थीस सुचीत केले आहे. परंतु अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय सुनावणी दरम्यान माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले होते. त्यास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुनश्च: माहिती पुरविण्याचे आदेशित केले होते. त्यानुसार दिनांक ११.०३.२०२२ रोजी अपिलार्थीस पुनश्च: माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच त्याची पोहच पावती आयोगासमोर सादर केली आहे.



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

६. निष्कर्ष –

१. सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दोनदा पुरविलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढणे क्रमप्राप्त ठरते.

**आदेश**

**वरील निष्कर्षावरुन प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १२.११.२०२४**

जावक क्रमांक 178 दिनांक 10 JAN 2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर